**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**बुधवार दिनांक १५ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **शेतकऱ्यांची 48 हजार कोटींची वीजबिल थकबाकी माफ करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा.**
2. **केंद्रीय मंत्रिमंडळाची सेमीकंडक्टर डिझाइनच्या विकासासाठी 'सेमिकॉन २.०' ला मान्यता. मोबाईल फोन उत्पादन प्रोत्साहन योजनेलाही मंजुरी.**
3. **भारत-युनायटेड किंगडममुक्त व्यापार करार आजपासून लागू/ सर्व स्तरातून कराराचं स्वागत.**
4. **नागपूर जिल्हा क्रीडा संकुलासाठी १०० कोटींच्या प्रकल्पास शासनाची मंजुरी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला पाठपुरावा.**

---------------------------------------------------

थकीत वीज बिल माफ

साडेसात अश्वशक्ती शक्तीपर्यंतच्या वीजेचे शेतकऱ्यांचे ४८ हजार कोटींचे थकीत जुने वीज बिल माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेबद्दल भाजप किसान मोर्चातर्फे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथील सत्कार सोहळ्याच्या उत्तरात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.....

***(होल्ड बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 38 सेकंद)***

आज कर्जमाफी व्यतिरिक्त शेतकऱ्यास 95 हजार कोटींचे साहय दिले जात असून शेतीक्षेत्र सक्षम आणि शाश्वत व्हावे यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार हातात हात घालून प्रयत्न करत आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. राज्यात 52 टक्के भाग अवर्षणप्रवण असताना दुसरीकडे अनेक भागांत पावसाचे पाणी समुद्रात जाऊन वाया जाते. गोदावरी, तापी खोऱ्यांत हे पाणी यावे याकरिता वैनगंगा, नळगंगा सारख्या योजनांतून नद्या तयार करण्यात येत असून वाहून जाणारे पाणी उचलले जाईल आणि सुमारे 24 नवी धरणे आणि 16 जुन्या धरणांची उंची वाढविली

जाईल. विदर्भात एकही जिल्हा दुष्काळी राहणार नाही. याचवर्षी हे काम पूर्ण करण्याकरिता वेगवान प्रयत्न सुरू आहेत, असही मुख्यमंत्री म्हणाले.

-----------------------------------------------

दत्तात्रय भरने

राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध व्हावे आणि निकृष्ट किंवा बनावट बियाण्यांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी राज्य शासन सर्वसमावेशक बियाणे धोरण तयार करणार असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. नव्या धोरणात क्यूआर कोडद्वारे बियाण्यांचा मागोवा, ई-लॅब प्रणाली, आधुनिक तपासणी पद्धती आणि गुणवत्ता नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासह शेतकऱ्यांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्याच्या उपाययोजनांचा समावेश करण्यात येणार आहे.

-----------------------------------------------

एसटी वृक्षारोपण

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीन राज्य शासनाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या राज्यव्यापी वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत अकोला येथील डेपो क्रमांक २ मध्ये वृक्षारोपण करण्यात आले. अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार रणधीर सावरकर यांनी वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे हवामानात मोठे बदल होत असून, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची गरज अधिक महत्त्वाची बनल्याचे सांगितले. वाढते प्रदूषण, कमी होत चाललेला पाऊस आणि बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण हे राष्ट्रीय कर्तव्य समजून त्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

-----------------------------------------------

केंद्रीय मंत्रिमंडळ

केंद्रीय मंत्रिमंडळाने भारतातील सेमीकंडक्टर रचना आणि उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी सेमिकॉन २.० योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेसाठी एक लाख २७ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नवी दिल्लीत आज मंत्रिमंडळाच्या निर्णयांची माहिती देताना केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं की, सेमिकॉन १.० च्या यशानंतर भारताला जागतिक सेमीकंडक्टर क्षेत्रात अग्रस्थान मिळवून देण्याच्या उद्देशाने ही योजना राबवण्यात येणार आहे. मंत्रिमंडळाने मोबाईल फोन उत्पादन प्रोत्साहन योजनेलाही मंजुरी दिली

आहे. या योजनेसाठी ६२ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ती पुढील पाच वर्षांसाठी लागू असेल. देशात मोबाईल फोन उत्पादनाला चालना देण्यासाठी आणि रोजगार निर्मीतीकरीता या योजनेसंदर्भात माहिती देतांना वैष्णव यांनी सांगितले की ........

***(होल्ड बाईट- केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव 23 सेकंद)***

याशिवाय, मंत्रिमंडळाने आत्मनिर्भर भारतासाठी राष्ट्रीय युरिया गुंतवणूक धोरण-२०२६ यालाही मंजुरी दिली आहे. देशात गॅस-आधारित युरिया उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी नव्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देणं आणि युरिया उत्पादनात स्वयंपूर्णता साधणं हा या धोरणाचा उद्देश आहे.

--------------------------------------------------

अवैध खनिज उत्खनन

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील फत्तापूर येथे मोठ्या प्रमाणावर झालेल्या कथित अवैध खनिज उत्खननाची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गंभीर दखल घेतली आहे. दोन हजार ब्रासच्या परवान्याच्या तुलनेत सुमारे ३३ हजार ब्रास अवैध उत्खनन झाल्याचा आरोप असून, दोषी आढळल्यास खाणकाम व्यावसायिकासह तलाठी, तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि प्रांताधिकारी यांच्यावर सामूहिक जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केल.

--------------------------------------------------

सामंजस्य करार

तरुण उद्योजकांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना चालना देण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या 'एसजीबीएयू रिसर्च अँड इन्क्युबेशन फाउंडेशन' आणि महाराष्ट्र शासनाच्या 'अमृत' संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत सुरुवातीला २५ नवसंशोधकांची निवड करण्यात येणार असून, प्रत्येक स्टार्टअपला एक वर्षासाठी दरमहा २५ हजार रुपयांचे सीड फंडिंग दिले जाणार आहे. तसच विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरमार्फत प्रयोगशाळा, कार्यशाळा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

--------------------------------------------------

सुप्रिया सुळे

मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाला शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष पाठिंबा देणार असल्याच्या बातम्यांमध्ये कोणतंही तथ्य नसल्याचं खासदार सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केलं आहे. या संदर्भात पक्षाकडे

कोणताही अधिकृत प्रस्ताव आलेला नसून, अशा कोणत्याही चर्चांना आधार नसल्याचं त्यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार हे विधेयक मांडणार असल्याची चर्चा आहे. आपला पक्ष या विधेयकाला पाठिंबा देणार असल्याच्या बातम्या सकाळपासून प्रसिद्ध झाल्या. मात्र, पक्षानं याबाबत कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही. सरसकट प्रत्येक राज्यात ५० टक्के जागा वाढवल्या जातील, असं एक सूत्र सरकारनं सुचवलं आहे. हा पर्याय योग्य वाटतो, मात्र आम्ही इंडिया आघाडीत चर्चा करून नंतर सांगतो, सर्वांना एकत्र बोलवा, वेगवेगळं बोलावू नका, असं आम्ही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना सांगितलं आहे.

---------------------------------------------------

मुक्त व्यापार करार

भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यातील मुक्त व्यापार करार आजपासून लागू झाला आहे. या करारामुळे भारतातून यूकेमध्ये होणाऱ्या ९९ टक्के निर्यातीवर कोणतेही सीमाशुल्क आकारले जाणार नाही. कराराअंतर्गत निर्यातीसाठी मालाची पहिली खेप आज न्हावाशेवा बंदरातून रवाना करण्यात आली.या निमित्ताने मुंबईतील ब्रिटिश उप उच्चायुक्तालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या करारामुळे व्यापार, गुंतवणूक आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळेल, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी हा करार दोन्ही देशांतील व्यापारासाठी नवी दारे उघडणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

---------------------------------------------------

अंबादास दानवे

शिवसेना (ठाकरे गट)चे नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राम मंदिरासाठी जमा झालेल्या निधीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करत भाजपवर आरोप केले आहेत. नागपुरात रामरक्षा महाआरती कार्यक्रमानिमित्त पत्रकारांशी बोलताना, प्रभू श्रीरामाच्या नावावर राजकारण आणि भ्रष्टाचार होऊ नये, असे ते म्हणाले.

---------------------------------------------------

क्रीडा संकुल

नागपूर जिल्हा क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी १०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाला राज्य शासनान प्रशासकीय मान्यता दिली आहे. शालेय शिक्षण आणि  क्रीडा विभागान

यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, या प्रकल्पामुळे नागपूरमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध होणार आहेत. प्रकल्पांतर्गत सिंथेटिक ॲथलेटिक्स ट्रॅक, ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदान, शूटिंग रेंज, बहुउद्देशीय इनडोअर हॉल, आर्चरी रेंज, आधुनिक व्यायामशाळा तसच खेळाडूंसाठी स्वतंत्र वसतिगृहांची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठीचा संपूर्ण निधी शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागामार्फत उपलब्ध करून दिला जाणार आहे. महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाला मंजुरी मिळाल्याच सांगण्यात आल आहे.

---------------------------------------------------

फिफा विश्वचषक

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत गतविजेता अर्जेंटिना आणि इंग्लंड यांच्यात आज दुसरा उपांत्य सामना होणार आहे. अमेरिकेतील अटलांटा येथे हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडेबारा वाजता सुरू होईल. याआधी, टेक्सास येथे काल झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात स्पेनने फ्रान्सचा दोन-शून्य असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

---------------------------------------------------

हवामान

नागपूर प्रादेशिक हवामान केंद्रान भंडारा, गोंदिया, नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी पुढील तीन तासांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या काळात काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगान सोसाट्याचा वारा आणि तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---------------------------------------------------